**दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, सांगोला यांचे न्यायालयात**
**नियमित दिवाणी मुकदमा नं. २०७/२०१३**
**निशाणी ४६ लगत आदेश**
(कृष्णा विरुध्द भिमराव)

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी त्यांचे विरुध्द पारीत झालेला 'पुरावा बंद' चा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी असे कथन केले आहे की, वादीने सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दिले असून वादीचा उलटतपास पूर्ण झालेला आहे. वादी हे वयस्कर असल्यामुळे तेसच ते भिक्षुकीसाठी बाहेरगावी गेले असल्याने वादी यांना पुरावा वेळेत देता आला नाही. त्यामुळे वादीविरुध्द पुरावा बंद करण्याचा आदेश झाला आहे. सदरचा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. तरी वादी विरुध्द पारीत झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द करण्यात येवून वादी यांना पुरावा देण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. सदरच्या अर्जावर प्रतिवादीतर्फे म्हणणे दिले आहे की, अर्जातील मजकुर खोटा आहे.सबब, वादीचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

४. दोन्ही पक्षकारांतर्फे युक्तिवाद ऐकला. वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादी विरुध्द जाहीर ठराव होवून मिळणेसाठी दाखल करणेत आलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात वादीने सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दिले असून वादीचा उलटतपास पूर्ण झालेला आहे. वादी हे वयस्कर असल्यामुळे तेसच ते भिक्षुकीसाठी बाहेरगावी गेले असल्याने वादी यांना पुरावा वेळेत देता आला नाही. त्यामुळे वादीविरुध्द पुरावा बंद करण्याचा आदेश झाला आहे.

५. सदर दाव्यात जर वादी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली नाही, तर ते

त्यांच्या कायदेशीर न्यायहक्कांपासून वंचित राहू शकतात. त्याचप्रमाणे जर वादींना त्यांची बाजूच मांडण्याची संधी दिली नाही, तर त्यांचे म्हणणे अभिलेखावर येणार नाही व गुणवत्तेवर निकाल देता येणार नाही. त्याचप्रमाणे नैसर्गिक न्यायतत्तवास अनुसरुन दोन्ही पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्यास पुरेपूर संधी देण्यास अगत्याचे आहे. अशा परिस्थितीत जर वादी यांची प्रार्थना नाकारली तर निश्चितपणे त्यांना यांच्या न्यायहक्कांस बाधा पोहचू शकते. याउलट, अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढणार आहे. अर्ज मंजूर केल्याने प्रतिवादीचे नुकसान होणार नाही. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो –

**आ दे श**

१. अर्ज (निशाणी क्र. ४६) वादी यांनी रक्कम रु. ५०/– दंड प्रतिवादींना देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांचे प्रार्थनेनुसार त्यांना पुढील पुरावा देण्यास परवानगी देण्यात येते.

सांगोला. (श्री संजय मो. घुगे)
दिनांक –२२/०२/२०२४ दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला